# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २७/०७/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

### सर्पदंशामुळे मृत्यु

**पो. स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा हेटी येथे दि. २६/०७/२२ चे ०५.०० वा. दरम्यान **कु. ऐश्वर्या गजानन तुमाने(मृतक), वय ७ वर्ष रा. हेटी** ही स्वताचे शेतामध्ये कामाला गेली असता दि १३/७/२२ चे १३.०० वा. सुमारास काम करतेवेळी तिला सापाने डाव्या पायाचे एडी जवळ चावा घेतला. त्यामुळे तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचारा करीता सरकारी दवाखाना कन्हान येथे नेले तिथे काही उपचार करुन डॉक्टरांनी रेफर केल्याने मेओ हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता उपचार सुरु असता दि. २४/०७/२२ चे ०१.३० वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गजानन मधुकरजी तुमाने, वय ४२ वर्ष रा. हेटी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार गुप्ता ९५११२४७२६१ हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ८ कि. मी. अंतरावरील मौजा वारेगाव बिड टोला कन्हान नदीच्या पात्रात दिनांक २६/०७/२०२२ चे १८.०० वा. दरम्यान **अभिषेक श्रीकृष्ण गोडबोले(मृतक), वय २१ वर्ष, रा. रोहण्सस ता. सौंसर, जि. छिंदवाडा मध्यप्रदेश** याचे प्रेत वारेगाव बिड टोला कन्हान नदीच्या पात्राचे किणाऱ्यावर मिळुन आले. त्यास पो.स्टे. खापरखेडा येथील पोलिस स्टाफने उपचाराकरीता मेओ हॉस्पिटल नागपुर येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन २०.२० वा. उपचारापुर्वी मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार शरद डोंगरे पो.स्टे. खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक अश्विन गजभिये हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०७ कि.मी अंतरावरील मौजा मनसर येथे दिनांक २५/०७/२०२२ चे २१:०० वा. ते दिनांक २६/०७/२०२२ चे ०७:०० वा. दरम्यान **लक्ष्मण परसराम सोनवने(मृतक), वय ५५ वर्षे रा. वार्ड नं. ५ पार्वतीबाई शेंडे यांचे घरी किरायाणे मनसर** यांनी दि. २५/०७/२०२२ रोजी आपल्या पतनीला ८००/रू दे असे बोलले असता पत्नीने 'माझ्या कडे दिलेले पैसे खर्च झाले माझ्या कडे पैसे नाही' तर यातील मृतक याने 'तु मला पैसे देत नाही तर पाहुन घे' असे म्हणुन घरून निघुन गेले. तसेच मृतक हे दारू पिण्याच्या सवईचा असुन किरायाचे राहते घरी लक्ष्मण परसराम सोनवने यांनी खिडकीला स्वता:च्या दुपट्याने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शकुंतला लक्ष्मणजी सोनवाने वय ३५ वर्षे रा. वार्ड नं. ५ पार्वतीबाई शेंडे यांचे घरी किरायाणे, मनसर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गजानन ऊकेबोंद्रे मो.क्र. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर